# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मंजूर विकास योजना (सुधारीत) नागपूर
**{नगर रचना विभाग}** मौजा - नागपूर येथील जुनी मंगळवारी नवाबपूरा भागातील खालील नमुदप्रमाणे रस्ते रूंदीकरणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेबाबत.

(1) चंद्रशेखर आझाद चैकाजवळून ते गंगाबाई घाट बुध्द विहारापर्यंत रस्ता 12.00 मी.
(2) मिशन स्कुल रोड, गंगाबाई घाट रोड ते खोब्रागडे दवाखाना एन.आय.टी. मैदानापर्यंत रस्ता 9.00 मी.
(3) गांडलीवाडा रोड म्हणजे गंगाबाई घाट रोडपासून ते इटकेलवार वाडयाजवळ श्री. उमाठे यांचे घरापर्यंत रस्ता 9.00 मी.

संदर्भ:- मा. आयुक्त महानगरपालिका, नागपूर यांचे दि. 27.07.2025 रोजीचे निर्देश

मौजा-नागपूर मधील जुनी मंगळवारी, नबाबपुरा हा फार जुना व दाटीवाटीच्या क्षेत्रातील भाग असून, सदर भाग ही जुनी वस्ती आहे. ही वस्ती उत्तरेकडे सेंट्रल एव्हेन्यु रोड (C.A. Road), पुर्वेकडे टेलिफोन एक्सचेंज रोड व पश्चिमेकडे नबाबपुरा रोड ने वेढीलेली आहे. या भागाअंतर्गत परिसरातील विद्यमान रस्ते फारच अरूंद असल्याने या भागात वाहतुकीची अडचण होत असते. या भागातील रस्ते रूंद करण्यात यावे, याबाबत नागरीकांची सतत मागणी आहे. ही बाब विचारात घेता, मा. आयुक्त महोदयांनी इतर विभागीय अधिकाऱ्यांसोबत जागेचे प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण करून उक्त स्थळनिरीक्षणाच्या अनुषंगाने स्थानिक नागरीकांनी सुचित केल्यानूसार व दि. 27.07.2025 रोजी मा. आयुक्त महोदय व मा. आमदार श्री. प्रविणजी दटके यांच्यासोबत बैठकीत झालेल्या चर्चेनूसार मा. आयुक्त महोदयांनी नमूदप्रमाणे रस्त्यांबाबत कलम-37 अन्वये प्रस्ताव तयार करणेबाबत निर्देशित केलेले आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | प्रस्तावित रस्त्यांची रूंदी |
|---|---|---|
| 1 | चंद्रशेखर आझाद चैकाजवळून ते गंगाबाई घाट बुध्द विहारापर्यंत (गंगाबाई घाट रोड) | 12.00 मी. |
| 2 | मिशन स्कुल रोड, गंगाबाई घाट रोड ते खोब्रागडे दवाखाना एन.आय.टी. मैदानापर्यंत | 9.00 मी. |
| 3 | गांडलीवाडा रोड म्हणजे गंगाबाई घाट रोडपासून ते इटकेलवार वाडयाजवळ श्री. उमाठे यांचे घरापर्यंत | 9.00 मी. |

वरीलप्रमाणे मौजा-नागपूर येथील जुनी मंगळवारी नवाबपूरा भागातील रस्ते
(1) चंद्रशेखर आझाद चैकाजवळून ते गंगाबाई घाट बुध्द विहारापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 6.00 मी. वरून प्रस्तावित रूंदी 12.00 मी. करणे.
(2) मिशन स्कुल रोड, गंगाबाई घाट रोड ते खोब्रागडे दवाखाना एन.आय.टी. मैदानापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 4.50 मी. वरून प्रस्तावित रूंदी 9.00 मी. करणे.
(3) गांडलीवाडा रोड म्हणजे गंगाबाई घाट रोडपासून ते इटकेलवार वाडयाजवळ श्री. उमाठे यांचे घरापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 4.50 मी. वरून प्रस्तावित रूंदी 9.00 मी. करण्याबाबत.

विकास योजना भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे उक्त फेरबदल प्रस्ताव करणेकरीता मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-2496/ 2643/प्र.क्र.300 (अ)/97/नवि-9, दि. 07.01.2000 अन्वये भागशः मंजुर झालेला असून व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-2400/1628/प्र.क्र.200/ नवि-9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झालेली असून ती अनुक्रमे दि. 01.03.2000 व पुर्नप्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस - 2400 / 1628 / प्र. क्र. 200 / 2000 / नवि - 9, दि. 10.09.2001 रोजी मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि. 21.09.2001 पासून अंमलात आलेली असून विषयांकित जागेकरीता नागपूर महानगरपालिका ‘‘ नियोजन प्राधिकरण ‘‘ आहे.

उक्त फेरबदल मंजूर विकास योजनेत प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 फेरबदल करणेस्तव महानगरपालिकेच्या ठराव घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचा ठरावास मंजूरी प्रदान केल्यानंतर त्यासंबंधिची सूचना शासन राजपत्रा, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप / हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

त्याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपुर्ण वैधानिक कार्यवाही केल्यानंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप / हरकतीवर सूनावणी देवून व तद्नंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करण्याकरीता प्रस्ताव मंजूरीस्तव व प्रशासकीय ठराव पारीत करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

त्यानुषंगाने, मौजा-नागपूर येथील जुनी मंगळवारी नवाबपूरा भागातील खालील नमूद रस्त्यांच्या रूंदीकरणाबाबत.

(1) चंद्रशेखर आझाद चैकाजवळून ते गंगाबाई घाट बुध्द विहारापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 6.00 मी. वरून प्रस्तावित रूंदी 12.00 मी. करणे.

(2) मिशन स्कुल रोड, गंगाबाई घाट रोड ते खोब्रागडे दवाखाना एन.आय.टी. मैदानापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 4.50 मी. वरून प्रस्तावित रूंदी 9.00 मी. करणे.

(3) गांडलीवाडा रोड म्हणजे गंगाबाई घाट रोडपासून ते इटकेलवार वाडयाजवळ श्री. उमाठे यांचे घरापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 4.50 मी. वरून प्रस्तावित रूंदी 9.00 मी. करण्याबाबत प्रस्तावित करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्तावास मा. आयुक्त महोदयांनी मान्यता प्रदान केली असून, सदर फेरबदलाचा प्रस्ताव विचारात घेणेकरीता सादर.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 45/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 19/09/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मंजूर विकास योजना (सुधारीत) नागपूर मौजा - नागपूर येथील जुनी मंगळवारी नवाबपूरा भागातील खालील नमुदप्रमाणे रस्ते रूंदीकरणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेबाबत.

(1) चंद्रशेखर आझाद चैकाजवळून ते गंगाबाई घाट बुध्द विहारापर्यंत रस्ता 12.00 मी.
(2) मिशन स्कुल रोड, गंगाबाई घाट रोड ते खोब्रागडे दवाखाना एन.आय.टी. मैदानापर्यंत रस्ता 9.00 मी.
(3) गांडलीवाडा रोड म्हणजे गंगाबाई घाट रोडपासून ते इटकेलवार वाडयाजवळ श्री. उमाठे यांचे घरापर्यंत रस्ता 9.00 मी.

संदर्भ:- मा. आयुक्त महानगरपालिका, नागपूर यांचे दि. 27.07.2025 रोजीचे निर्देश

मौजा-नागपूर मधील जुनी मंगळवारी, नबाबपुरा हा फार जुना व दाटीवाटीच्या क्षेत्रातील भाग असून, सदर भाग ही जुनी वस्ती आहे. ही वस्ती उत्तरेकडे सेंट्रल एव्हेन्यु रोड (C.A. Road), पुर्वेकडे टेलिफोन एक्सचेंज रोड व पश्चिमेकडे नबाबपुरा रोड ने वेढीलेली आहे. या भागाअंतर्गत परिसरातील विद्यमान रस्ते फारच अरूंद असल्याने या भागात वाहतुकीची अडचण होत असते. या भागातील रस्ते रूंद करण्यात यावे, याबाबत नागरीकांची सतत मागणी आहे. ही बाब विचारात घेता, मा. आयुक्त महोदयांनी इतर विभागीय अधिकाऱ्यांसोबत जागेचे प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण करून उक्त स्थळनिरीक्षणाच्या अनुषंगाने स्थानिक नागरीकांनी सुचित केल्यानूसार व दि. 27.07.2025 रोजी मा. आयुक्त महोदय व मा. आमदार श्री. प्रविणजी दटके यांच्यासोबत बैठकीत झालेल्या चर्चेनूसार मा. आयुक्त महोदयांनी नमूदप्रमाणे रस्त्यांबाबत कलम-37 अन्वये प्रस्ताव तयार करणेबाबत निर्देशित केलेले आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | प्रस्तावित रस्त्यांची रूंदी |
|---|---|---|
| 1 | चंद्रशेखर आझाद चैकाजवळून ते गंगाबाई घाट बुध्द विहारापर्यंत (गंगाबाई घाट रोड) | 12.00 मी. |
| 2 | मिशन स्कुल रोड, गंगाबाई घाट रोड ते खोब्रागडे दवाखाना एन.आय.टी. मैदानापर्यंत | 9.00 मी. |
| 3 | गांडलीवाडा रोड म्हणजे गंगाबाई घाट रोडपासून ते इटकेलवार वाडयाजवळ श्री. उमाठे यांचे घरापर्यंत | 9.00 मी. |

वरीलप्रमाणे मौजा-नागपूर येथील जुनी मंगळवारी नवाबपूरा भागातील रस्ते
(1) चंद्रशेखर आझाद चैकाजवळून ते गंगाबाई घाट बुध्द विहारापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 6.00 मी. वरून प्रस्तावित रूंदी 12.00 मी. करणे.
(2) मिशन स्कुल रोड, गंगाबाई घाट रोड ते खोब्रागडे दवाखाना एन.आय.टी. मैदानापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 4.50 मी. वरून प्रस्तावित रूंदी 9.00 मी. करणे.
(3) गांडलीवाडा रोड म्हणजे गंगाबाई घाट रोडपासून ते इटकेलवार वाडयाजवळ श्री. उमाठे यांचे घरापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 4.50 मी. वरून प्रस्तावित रूंदी 9.00 मी. करण्याबाबत.

विकास योजना भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे उक्त फेरबदल प्रस्ताव करणेकरीता मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-2496/ 2643/प्र.क्र.300 (अ)/97/नवि-9, दि. 07.01.2000 अन्वये भागशः मंजुर झालेला असून व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-2400/1628/प्र.क्र.200/ नवि-9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झालेली असून ती अनुक्रमे दि. 01.03.2000 व पुर्नप्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस - 2400 / 1628 / प्र. क्र. 200 / 2000 / नवि - 9, दि. 10.09.2001 रोजी मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि. 21.09.2001 पासून अंमलात आलेली असून विषयांकित जागेकरीता नागपूर महानगरपालिका ‘‘ नियोजन प्राधिकरण ‘‘ आहे.

उक्त फेरबदल मंजूर विकास योजनेत प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 फेरबदल करणेस्तव महानगरपालिकेच्या ठराव घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचा ठरावास मंजूरी प्रदान केल्यानंतर त्यासंबंधिची सूचना शासन राजपत्रा, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप / हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

त्याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपुर्ण वैधानिक कार्यवाही केल्यानंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप / हरकतीवर सूनावणी देवून व तद्नंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करण्याकरीता प्रस्ताव मंजूरीस्तव व प्रशासकीय ठराव पारीत करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.
त्यानुषंगाने, मौजा-नागपूर येथील जुनी मंगळवारी नवाबपूरा भागातील खालील नमूद रस्त्यांच्या रूंदीकरणाबाबत.
(1) चंद्रशेखर आझाद चैकाजवळून ते गंगाबाई घाट बुध्द विहारापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 6.00 मी. वरून प्रस्तावित रूंदी 12.00 मी. करणे.
(2) मिशन स्कुल रोड, गंगाबाई घाट रोड ते खोब्रागडे दवाखाना एन.आय.टी. मैदानापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 4.50 मी. वरून प्रस्तावित रूंदी 9.00 मी. करणे.
(3) गांडलीवाडा रोड म्हणजे गंगाबाई घाट रोडपासून ते इटकेलवार वाडयाजवळ श्री. उमाठे यांचे घरापर्यंत रस्ता विद्यमान रूंदी 4.50 मी. वरून प्रस्तावित रूंदी 9.00 मी. करण्याबाबत प्रस्तावित करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्तावास मा. आयुक्त महोदयांनी मान्यता प्रदान केली असून, सदर फेरबदलाचा प्रस्ताव विचारात घेण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.